## मराठी भाषा शाळा प्रमुख टप्पे व माहिती

१९६० - १९७० पासून कॅनडा आणि अमेरिका येथे वास्तव्यात असणाऱ्या मराठी वंशाच्या लोकांनी अनेक शहरातून महाराष्ट्र मंडळांची स्थापना करून त्यांच्या अमेरिकेत जन्मलेल्या मुलांना मराठी भाषा शिकवण्यासाठी मराठी शाळा सुरु केल्या. पण या शाळा अमेरिकेत अनेक शहरात असल्याने संघटीत होऊ शकल्या नाहीत. ८० च्या दशकात बृहन महाराष्ट्र मंडळ नॉर्थ अमेरीका (बीएमएम) या संघटनेमुळे उत्तर अमेरिकेतील मंडळे एकत्र आली. उत्तर अमेरिकेतील मराठी वंशाचे तरुण आणि लहान मुले यांना एकत्रित करण्याच्या दृष्टीने अनेक उपक्रम बीएमएम ने सुरु केले. त्यात प्रामुख्याने पुढच्या पिढीत मराठी भाषा रुजवणे आणि टिकवणे हा विचार होता. या मुलांना मराठी भाषा समजावी, मराठी भाषेतून संभाषण करता यावे हा मुख्य उद्धेश होता. या बरोबर मराठी भाषेतील पुस्तके वाचता आली आणि थोडे फार लिखाण जमले तर उत्तमच!

## मराठी भाषा शाळा स्थापना आणि मान्यता

२००७ मध्ये फिलाडेल्फिया येथील “BMM 2020 summit” मध्ये मराठी भाषा शिकवण्यासाठी बीएमएम मराठी शाळेच्या उपक्रमाला मान्यता मिळाली. बीएमएम कार्यकारिणीने मराठी शाळेसाठी वेगळी समिती स्थापन केली. या समिती मध्ये संचालिका सुनंदा टुमणे यांच्या बरोबर काही मराठी भाषा जाणकार होते. बीएमएम मराठी शाळा समितीने, बीएमएम कार्यकारिणीच्या मदतीने भारती विद्यापीठ पुणे या संस्थेबरोबर affiliation चे काम पूर्ण केले. समितीने भारत आणि अमेरीका येथील शिक्षणतज्ञ, मराठी भाषा जाणकार, आंतरराष्ट्रीय भाषा अभ्यासक्रम सूची, पाठ्यपुस्तक महामंडळ आणि अनेक अनुभवी शिक्षकांच्या मदतीने बीएमएम मराठी शाळेसाठी तीन स्तरीय मराठी भाषा अभ्यासक्रम तयार केला. या अभ्यासक्रमाला भारती विद्यापीठ पुणे यांची मान्यता मिळाली तसेच बीएमएम आणि भारती विद्यापीठ पुणे यांच्यात उत्तर अमेरिकेत सर्वत्र एक छत्री मराठी शाळा उपक्रम सुरु करण्याबाबत करार झाला. स्वर्गीय श्री पतंगराव कदम यांनी उपक्रमाला विशेष पाठींबा दिला. त्यांनतर बीएमएम मराठी शाळेने उत्तर अमेरिकेतील सात महाराष्ट मंडळात प्रयोगात्मक मराठी भाषा शाळा सुरु केल्या.

## बीएमएम मराठी भाषा शाळा अभ्यासक्रम

२००७ मध्ये बनवलेला तीन स्तरीय मराठी भाषा अभ्यासक्रम २०११ मध्ये पाच स्तरात विभाजित करण्यात आला. प्रयोगात्मक मराठी भाषा शाळा उपक्रमातून आलेल्या सूचना, अनुभव आणि संकल्पनाचा यात समवेश करण्यात आला. या अभ्यासक्रमाला भारती विद्यापीठ पुणे यांची मान्यता मिळाली. या अभ्यासक्रमानुसार प्रत्येक स्तर पार करण्यासाठी १२० शैक्षणिक तास इतके मराठी भाषेचे शिक्षण घेणे आवश्यक आहे.

© Copyright. Material used by participant BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

## बीएमएम मराठी भाषा शाळा विस्तार

२००७ ते २०१८ या ११ वर्षांच्या कालावधीत बीएमएम मराठी शाळेच्या सात शाखांचा हा उपक्रम छत्तीस मंडळाच्या पासष्ट शाखा एवढा वाढला आहे. या शाळांमधून अंदाजे पंधराशे विद्यार्थी आहेत. यात ४ वर्षे ते ९ वर्षे या वयोगाटातील मुले अधिक आहेत. तसेच १० ते १६ वयोगाटातील मुले देखील आहेत. मुलांना हसत खेळत मराठी शिकवण्यावर भर दिला जातो. सर्व शाखांमधून अंदाजे १५० स्वयंसेवक आणि हौशी शिक्षक आहेत.

## बीएमएम मराठी भाषा शाळा वेळापत्रक

या शाळा आठवड्यातून एकदा (शनिवार किंवा रविवार) भरतात. शाळेचा कालावधी साधारण २-१/२ तास असतो. स्थानिक मंडळ आणि स्थानिक शाळा समितील स्वयंसेवक, पालक, मराठी भाषा जाणकार आणि हौशी शिक्षक या शाळेत शिकवतात. सर्व शाळांमधून बीएमएम मराठी शाळेचा अभ्यासक्रम शिकवला जातो. अभ्यासक्रम सूची आणि पुरवणी सर्व बीएमएम मराठी भाषा शाळा शाखांना विनामूल्य देण्यात येते. ऑगस्ट/ सप्टेंबर पासून ते मे /जून असे शाळेचे शैक्षणिक वर्ष असते. एका वर्षात शाळेचे ६० ते ८० शैक्षणिक तास असतात. एका स्तराचा अभ्यासक्रम शिकवण्यासाठी दोन शैक्षणिक वर्षे लागतात.

## बीएमएम मराठी भाषा शाळा पाठ्यपुस्तके

मराठी वंशाच्या अमेरिकन मुलांना मराठी भाषा शिकवताना अनेक अडचणी येतात. पारंपारिक मराठी किंवा भारतीय संदर्भ या मुलांना कळणे अवघड असते. शिक्षकांना यामुळे भारतात उपलब्ध असलेल्या पुस्तकांचा विशेष उपयोग होत नाही. २०१२ मध्ये बीएमएम मराठी शाळा समितीने पाच स्तरीय अभ्यासक्रमावर पाच पाठ्यपुस्तके लिहिली. त्यात प्रसिद्ध कवींच्या सोप्या कविता, प्रार्थना, श्लोक, गमंत गाणी  या बरोबर अमेरिकेतील मराठी भाषा जाणकार, स्वयंसेवक आणि हौशी शिक्षकांनी लिखाण केले आहे. या पुस्तकातील धडे अमेरिकन संदर्भ वापरून लिहिले असल्याने मुलांना कळण्यास सोपे आहेत. ही पुस्तके सर्व बीएमएम मराठी शाळा शाखांना इ-बुक माध्यमातून विनामूल्य दिली जातात. तसेच बीएमएम मराठी शाळा समिती- भारती विद्यापीठ पुणे यांनी एकत्रितपणे सराव पुस्तकेही बनवली आहेत.

## बीएमएम मराठी भाषा शाळा आणि तंत्रज्ञान

बीएमएमच्या संकेतस्थळाला संलग्न असे संकेतस्थळ सुरु केले. शाळेसंबंधित माहिती अतिरिक्त अभ्यासक्रम सूची, पुरवणी, शैक्षणिक साहित्य जसे सराव पत्रके, पुस्तके, व्याकरण परिशिष्टे, कविता, श्लोक, प्रार्थना, गाणी, आकलन उतारे, गोष्टी आणि शैक्षणिक विडीयो

© Copyright. Material used by participant BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

अशी उपयुक्त माहिती संकेत स्थळावर मिळते. तसेच सर्व शाखांचे शिक्षक या संकेत स्थळावर त्यांनी बनवलेले साहित्य एकमेकांना उपलब्ध करून देतात. शाळेचे बरेचसे प्रशासकीय काम ही या संकेतस्थळावरून चालते. शाळेच्या अभ्यासक्रमावर आधारित काही शिक्षकांनी interactive इ-बुक, भाषा चाचणी आणि ॲप्स बनवले आहेत.

## परीक्षा

२०११ पासून बीएमएम- भारती विद्यापीठ पुणे यांनी एकत्रित मराठी भाषा परीक्षा घेण्यास सुरुवात केली. पाच स्तरांच्या अभ्यासक्रमावर पाच स्तरीय परीक्षा घेतल्या जातात. यात तोंडी परीक्षेवर भर दिला जातो आणि १०० गुणांपैकी ६० गुण संभाषण, श्रवण, वाचन आणि आकलन यासाठी असतात. ४० गुण हे लेखन, वाचन आणि आकलन यासाठी असतात. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना बीएमएम- भारती विद्यापीठ यांचे प्रशस्तीपत्रक दिले जाते.

## कार्यशाळा, शिबिरे, प्रकल्प आणि स्पर्धा

शाळेमध्ये अभ्यासाबरोबर इतर अनेक गोष्टींचा समवेश असतो. पाच स्तरीय अभ्यासक्रमात विविध कार्यशाळा जसे हस्तकला – कंदील, गुढी बनवणे, चिकण मातीपासून गणपतीची मूर्ती बनवणे. पेपर प्लेटचे घड्याळ बनवणे. दिवाळी आरास, रांगोळी, गणपती मखर इत्यादींचा समावेश आहे. या व्यतिरिक्त वार्षिकोत्सवात  नाटुकले, वक्तृत्व, गोष्ट सांगणे, श्लोक-कविता पठण असे कार्यक्रम पण असतात. सहल आणि भारतीय खेळ दिवस असे कार्यक्रम आयोजित केले जातात. इथे मुले लगोरी, विटी दांडू, उभा खो खो, हुतुतू असे खेळ शिकतात. काही हौशी मंडळांनी सूर्य नमस्कार, योग आणि मलखांब प्रात्यक्षिके ही आयोजित केली होती. नुकतीच बीएमएम मराठी शाळा समितीने सर्व शाखेतील मुलांसाठी अभ्यासक्रमावर आधारित स्पर्धा आयोजित केल्या आहेत. त्यात कविता, श्लोक पठण, गोष्ट सांगणे, उभ्या उभ्या विनोद, प्रवास वर्णन, निबंध, पत्र लेखन अश्या विविध स्पर्धा आहेत. यात अंदाजे ६०० मुलांनी भाग घेतला आहे.

बीएमएम मराठी शाळा समिती द्विवार्षिक दिवाळी अंकाचे प्रकाशन करते. बीएमएम अधिवेशन वर्षाच्या आधीच्या दिवाळीत हा अंक प्रकाशित होतो.  २०१६ -२०१७ यावर्षी मुलांनी कॅलेंडर ही बनवले होते.

## बीएमएम मराठी शाळा आणि बीएमएम अधिवेशन

बीएमएम अधिवेशनातही बीएमएम मराठी शाळेच्या सर्व शाखेतील विद्यार्थ्यांना भाग घेण्याची संधी मिळते. २०१३ बॉस्टन येथे शाळा बूथ. २०१५ लॉस एंजेलिस येथे शाळा बूथ प्रतिभा स्पर्धा आणि नाटुकले स्पर्धा. २०१७ ग्रॅन्ड रॅपिड्स येथे शाळा बूथ आणि समूहगान असे कार्यक्रम अधिवेशन समित्यांनी आयोजित केले होते. अधिवेशनातील समावेशामुळे

© Copyright. Material used by participant BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

मराठी शाळे बद्दल उत्तर अमेरिकेतील मराठी भाषिक समुदाय आणि सर्व मंडळे यांच्यात उत्सुकता वाढली आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला वाव आणि प्रोत्साहन मिळले आहे. तसेच शिक्षकांचा आत्मविश्वास ही वाढला आहे.

## वर्ल्ड लँग्वेज क्रेडिट आणि राज्य प्रमाणन

उत्तर अमेरिकेत स्पॅनिश ,फ्रेंच मॅन्डरीन चायनीज ,या भाषांचा समावेश वर्ल्ड लँग्वेज / सेकंड लँग्वेज या सदरात होतो .अमेरिकेत उच्च माध्यमिक शाळा (हायस्कूल) आणि विद्यापीठात शिकणाऱ्या मुलांना या भाषांचे सेकंड लँग्वेज क्रेडिट मिळते. अलीकडे अमेरिकेतील ५१ राज्यांपैकी बऱ्याच राज्यांमध्ये व्हिएतनामी ,अरेबिक आणि भारतीय भाषांपैकी तेलगु आणि तमिळ भाषांना अशी मान्यता प्राप्त झाली आहे .बीएमएम मराठी भाषा शाळा उपक्रमाला जवळ जवळ १२ वर्षे पूर्ण होत आहेत. काही मराठी शाळा शाखांनी या राज्यांतर्फे देण्यात येणाऱ्या प्रमाणनसाठी प्रयत्न सुरु केले .**ॲटलांटा** येथील शाखेला २०१५ मध्ये जॉर्जिया राज्यातर्फे प्रमाणन मिळाले आहे येथील विद्यार्थ्यांना .मराठी शाळेचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर हायस्कूलसाठी फॉरेन लँग्वेज चे क्रेडिट मिळते. २०१६ मध्ये **शिकागो** येथील शाखांना इलिनॉय राज्यातर्फे अशीच मान्यता मिळाली. यासाठी स्थानिक शाळेची समिती, स्वयंसेवक आणि शिक्षक यांनी भरपूर परिश्रम घेतले. नुकतेच टेक्सस राज्यातील काही ठिकाणी हायस्कूलसाठी मराठी भाषेचे फॉरेन लँग्वेज क्रेडिट मिळाले आहे. इतरही राज्यात असे प्रयत्न सुरु आहेत. तसेच कॅनडा मधील शाळांनाही हायस्कूलसाठी आंतरराष्ट्रीय भाषा शिक्षण प्रकल्पाअंतर्गत असे क्रेडिट मिळते.

## भविष्यातील उपक्रम आणि योजना

भविष्यात उत्तर अमेरिकेतील बीएमएम मराठी शाळेच्या सर्व शाखेतील विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसांचे शिबीर आयोजित करण्याची इच्छा आहे. परंतु हा खूपच धाडसी, गुंतागुंतीचा आणि खर्चिक प्रकल्प आहे. शिवाय यासाठी प्रचंड मनुष्यबळ ही लागेल. सर्व छत्तीस मंडळांच्या शाखांना त्या राज्यांचे प्रमाणन मिळावे म्हणून प्रयत्न केला जात आहे. तसेच या राज्यांमध्ये Seal of Bi-Literacy मराठी भाषेला प्राप्त व्हावे म्हणून प्रयत्न केले जात आहेत.

बीएमएम मराठी शाळेला स्थानिक विद्यापीठांची मान्यता मिळावी म्हणून प्रयत्नशील आहोत.

अमेरिकेतील मराठी वंशाचे तरुण, कुमार वयातील मुले आणि या समाजात विवाह करून आलेल्या अमराठी सदस्यांना मराठी भाषा आणि विशेष करून संभाषण शिकवण्यासाठी online मराठी शाळा सुरु करण्याचा ही मानस आहे.

© Copyright. Material used by participant BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**बीएमएम मराठी शाळा समिती**

मराठी शाळा हा बीएमएमचा फ्लॅग शिप (प्रमुख उपक्रम) आहे. या वाढत्या उपक्रमासाठी बीएमएम कार्यकारिणी व्यतिरिक्त वेगळी समिती असणे हे आवश्यकच होते. बीएमएम मराठी शाळा समिती ही शाळेच्या स्थापनेपासून अस्तित्वात आहे. बीएमएम शाळेसंदर्भात सर्व निर्णय, सर्व शाखांच्या आणि अधिकाऱ्यांच्या संमतीने घेणे. बीएमएम कार्यकारिणी आणि भारती विद्यापीठ पुणे यांच्या अधिकाऱ्यांसोबत बैठका घेऊन निर्णय घेणे. विविध शैक्षणिक संस्थाबरोबर करार करणे. शाळेचा विस्तार करणे, शाळेबद्दल जागरुकता निर्माण करणे, शिक्षक आणि स्वयंसेवक यांना प्रशिक्षण देणे, मार्गदर्शन करणे आणि प्रोत्साहन देणे. परीक्षा घेणे, स्थानिक शाळा आणि स्थानिक मंडळे यांच्यात समन्वय ठेवणे, शैक्षणिक पुस्तके आणि सामग्री निर्माण करणे, उपलब्ध करणे, आवश्यकते नुसार अभ्यासक्रमात बदल करणे, शाळा संकेतस्थळ, ईमेल ग्रुप सांभाळणे. शाळा संदर्भातील सर्व पत्र व्यवहार करणे अशी अनेक कर्तव्ये ही समिती पार पडते. समितीचे सर्व सदस्य हे स्वयंसेवक आहेत. या यशस्वी उपक्रमाचे श्रेय २००७ पासूनचे बीएमएम मराठी शाळा समितीचे सर्व सदस्य, सर्व शाखेतील शिक्षक, स्वयंसेवक, पालक, स्थानिक मंडळ अधिकारी आणि बीएमएम कार्यकारिणी सदस्य यांच्या अविश्रांत परिश्रमाला आणि निष्ठेला जाते.

🙏

© Copyright. Material used by participant BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.